# पुणे महानगरपालिका
## मालमत्ता व व्यवस्थापन विभाग

सालाबाद प्रमाणे पुणे शहरात साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवा करीता कोवीड-१९ या साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींमध्ये क्षेत्रीय कार्यालय निहाय श्रीगणेशमूर्ती विक्री गाळयांना तात्पुरत्या स्वरूपात परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीबाबत

**जाहीर प्रकटन**

सालाबादप्रमाणे यावर्षी साजरे होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना व मंडळांना श्री गणेश मूर्ती विकत घेण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत कोवीड-१९ या साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर रस्ता व पदपथावर श्रीगणेश मूर्ती विक्रीचे गाळे उभारण्यास परवानगी देण्यात येणार नसून, पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळया/बांधीव जागांवर, मैदाने, पटांगणे इ. जागांवर श्रीगणेश मूर्ती विक्री करणेकरीता परवानगी देण्यात येणार आहे. त्यानुसार या वर्षी श्रीगणेश मूर्ती विक्री करणेसाठी सर्व श्रीगणेश मूर्ती विक्रेत्यांना आवाहन करण्यात येत आहे.

**ऑनलाईन पद्धतीने अग्रक्रमानुसार येणाऱ्यास** व जास्तीत जास्त दिवसांकरीता मागणी करणाऱ्या अर्जदारास **प्राधान्य अशा पद्धतीने सदर कार्यवाही करण्यात येणार आहे.** त्यानुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने २०२० या वर्षासाठी पुणे महानगरपालिका हद्दीत क्षेत्रिय कार्यालय निहाय, १५' x १०' मापाचे गणपती गाळे विक्रीसाठी एकूण ४१ जागा निश्चित केल्या आहेत. त्याची यादी पुणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. सदर जाहीर प्रकटनाचे दिनांकापासून अर्ज सादर करण्याची मुदत दि. १३/०८/२०२० पर्यंत राहील. **ऑनलाईन** अर्ज http://ganeshstallpermit.punecorporation.org या लिंक द्वारे सादर करावे.

**श्रीगणेश मूर्ती गाळे विक्रीबाबतची कार्यपद्धती**

१. पुणे मनपाच्या http://ganeshstallpermit.punecorporation.org या संकेतस्थळावरील नमुना 'अ' नुसार अर्ज भरून ऑनलाईन द्वारे सादर करावे.

२. अर्जासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत जोडावे.

३. अनामत र.रू. १०,०००/- पुणे म.न.पा.च्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे कागदपत्रांची छाननी केल्यानंतर व पात्र झालेनंतर चलनाद्वारे जमा करावे.

४. अर्जाचे छाननीनंतर पात्र गाळेधारकाने आवश्यक दिवसांचे विहीत भाडे पुणे म.न.पा.च्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे चलनाद्वारे जमा करावे व सदरचे पैसे भरल्याची पावती ऑनलाईन अर्जामध्ये सादर करावी.

५.ऑनलाईन पद्धतीने अग्रक्रमानुसार येणाऱ्यास व जास्तीत जास्त दिवसांकरीता मागणी करणाऱ्या अर्जदारास प्राधान्य अशा पद्धतीने सदर कार्यवाही करण्यात येणार आहे.

६. पुणे म.न.पा. कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम पात्र गाळेधारकाने स्वतः स्वखर्चाने करावयाचे आहे.

७. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील नियमावली लागू राहील.

८. साथ प्रतिबंधक अधिनियम १८९७ मधील नियमावली लागू राहील.

९. मे. महाराष्ट्र शासन यांचेकडील वेळोवेळी जारी केलेल्या अधिसुचना लागू राहतील

१०. श्रीगणेशमूर्ती विक्रीच्या दोन गाळयांमध्ये २ मी. अंतर ठेवून गाळे उभारण्यात यावेत.

११. कोरोना विषाणुमुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण - पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी जारी केलेल्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१२. कोवीड-१९ या साथीच्या रोगाबाबत जनजागृतीचे फलक स्टॉलधारकाने स्वखर्चाने करावयाचे आहे.

१३. गणेशमूर्ती विक्रीची वेळ मे. शासनाने व पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार असेल.

१४. विक्री स्टॉल मधील दोन कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवणे, काम करणाऱ्या सर्व व्यक्तींनी मास्क व हातमोजे वापरणे त्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५. विक्री स्टॉलमधील कर्मचाऱ्यांमध्ये कोणतेही आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घेवून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१६. सर्व व्यक्तींनी आपापसात कमीत कमी ६ फुट इतके अंतर राखले पाहीजे, स्टॉलधारक ग्राहकांमध्ये शारीरीक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील व एकावेळी पाचपेक्षा अधिक व्यक्ती उपस्थित राहणार नाही याची दक्षता घेतील.

१७. हात स्वच्छ करण्याचे द्रव्य (हँडवॉश) व निर्जंतुकीकरण द्रव्य (सॅनिटायझर) हे सर्व प्रवेशद्वाराजवळ व निर्गमन द्वाराजवळ स्टॉलधारकांकडून पुरवणे बंधनकारक राहील.

१८. स्टॉलमध्ये शिरताना पायऱ्या व बाहेरील भाग १% सोडीअम हायपोक्लोराईट द्रावणाने दररोज फवारणी करून घ्यावी.

१९. स्टॉलचे काउंटर ग्राहक सोडून गेल्यानंतर १% सोडीअम हायपोक्लोराईट द्रावणाने पुसून घ्यावे.

२०. गणेशमूर्ती खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांनी देखील मास्क घालणे आवश्यक आहे.

२१. गाळे विक्री च्या जागी एकावेळी २० पेक्षा जास्त व्यक्ती जमा होणार नाहीत याची खबरदारी स्टॉलधारकांनी घेणे बंधनकारक राहील. यासाठी लागणारी उपाययोजना स्टॉलधारकांनी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

२२. नागरिकांनी मूर्ती घेण्यासाठी सुरक्षित अंतरे ठेवणेकरीता स्टॉलधारकांनी बांबूचे रेलिंग, बॅरेकेटींग करणे आवश्यक राहील.

२३. नागरिकांकडून गणेश मूर्तीची विक्री रक्कम शक्यतो ऑनलाईन, मोबाईल बँकिंग/कार्ड पद्धतीने स्विकारणेची व्यवस्था करणेत यावी.

२४. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तींची पुर्तता करणेकरीता नजीक असलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सुचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविणेत येईल. अशा ठिकाणांवर कोणताही अपघात, हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी गाळेधारकाची राहील. याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस असणार नाही.

२५. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची/राखणेची जबाबदारी सर्व गाळेधारकांची राहील. संबंधीत आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करून अनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम वजा करून घेण्यात येईल.

२६. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर २ दिवसाचे आंत स्वखर्चाने सदरचे तात्पुरत्या स्वरूपातील गाळ्याचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून देण्यात येईल. तसेच सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही याची खात्री गाळेधारकाने करून देणे आवश्यक राहील.

२७. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरूरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पुर्वसुचना देवून रद्द करण्याचा महानगरपालिकेस हक्क राहील.

दिनांक:- ०५/०८/२०२०

(राजेंद्र मुठे)
**उप आयुक्त**
मालमत्ता व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

## जाहीर प्रकटन

सन २०२० या वर्षासाठी पुणे महानगरपालिका नियोजित गणपती स्टॉल विक्रीसाठी पुणे महानगरपालिके तर्फे खालील जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | उप आयुक्त कार्यालय | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव व पत्ता | पुणे मनपा फटाका स्टोल नियोजित जागा | नियोजित स्टॉल संख्या (5 फुट अंतर सोडून) | अनामत रक्कम | निर्धारित भाडे प्रति स्टॉल प्रति दिन | सफाई शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिमंडळ कार्यालय क्र. 1 | नगर रोड-वडगाव शेरी क्षेत्रिय कार्यालय | लोहगाव स.नं. २०७ फिनिक्स मॉल शेजारील क्षेत्रिय कार्यालयाची जागा | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 2 | | | खराडी स.नं. १२, मैदान | 40 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 3 | | | खराडी स.नं. ५, ओटा मार्केट | 50 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 4 | | | वडगाव शेरी स.नं.39 ओटा मार्केट, पुण्यनगरी | 50 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 5 | | येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय | धानोरी स.नं. १६/3 ची अमेनिटी स्पेस जागा | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 6 | | | कळस स.नं. १२० नवीन मंडई जागा | 20 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 7 | | | धानोरी स.नं. १७ पैकी जुना जकात नाका जागा | 25 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 8 | | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | कै. बाबुराव सणस शाळा | 8 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 9 | | | बंड गार्डन पार्किंग जागा | 20 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 10 | परिमंडळ कार्यालय क्र. 2 | औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय | बाणेर स.नं. ८७, मंडई | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 11 | | | बालेवाडी स.नं. १७, प्ले ग्राउंड | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 12 | | | जुना जकात नाका स.नं.१ | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 13 | | | पाषाण स.नं.१२१ | 19 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 14 | | घोले रोड क्षेत्रिय कार्यालय | शिवाजी व्यायाम मंडळ | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 15 | | | तुकाराम ओबाळे मैदान गोखले नगर | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 16 | | | पंडित जवाहरलाल नेहरु सांस्कृतिक भवन | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 17 | | कोथरुड-बावधन क्षेत्रिय कार्यालय | कोथरुड स.नं. ५४/४, ओटा मार्केट आरक्षणापैकी जागा | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 18 | | | बावधन स.नं. स्वामी विवेकानंद शाळा | 15 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 19 | | | कोथरुड ९४ व ९५ सावरकर मैदान | 20 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | परिमंडळ कार्यालय क्र. 3 | धनकवडी-सहकार नगर क्षेत्रिय कार्यालय | पर्वती स.न.९३ सह्याद्री मैदान, लक्ष्मीनगर | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 21 | | | कात्रज स.नं.७३ प्रायमरी स्कूल आरक्षित जागा, थोरवे प्राथमिक शाळा | 25 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 22 | | सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय | धायरी स.नं. १४४/४, यशवंत विहार सोसायटी, धायरी, अमेनीटी स्पेस | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 23 | | | वडगाव बु. स.न. १२, ओटा मार्केट | 8 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 24 | | | वडगाव बु. स.नं. ४/२ब | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 25 | | वारजे-कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | वारजे-कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 26 | | | एरंडवणा स.नं.३६/१+८+९ प्लॉट नं.१, कर्नाटक हायस्कूल मागे | 4 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 27 | | | नदीकाठाचा १०० मी डी पी कर्वे नगर रस्ता स.नं. ११,१२,१३ | 20 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 28 | | | स.नं. ११२, शारदा महिला प्रशिक्षण केंद्राची जागा पार्किंग मध्ये | 3 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 29 | | | वारजे स.नं. १११/१ | 4 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 30 | | | वारजे स.नं. ८६/५/१ | 4 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 31 | | | सम्राट अशोक विद्या मंदिराचे मैदान कर्वेनगर | 8 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 32 | परिमंडळ कार्यालय क्र. 4 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर स.नं. १५७, १५८, १६१ येथील हायस्कूल आरक्षित जागा सि.स.नं. १६५६, भोसले नगर येथील जागा | 35 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 33 | | | स.नं. ६५, वंडर लँड स्कूल लगत हांडेवाडी रोड जवळ | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 34 | | | हडपसर स.नं. १३७, मोहन धारिया उद्याना समोरील प्ले ग्राउंड, हडपसर मुंढवा रस्ता | 25 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 35 | | वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय | स.नं.४, उद्यान आरक्षण जागा | 15 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 36 | | कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय | कोंढवा खुर्द स.नं.४ पार्क आरक्षणापैकी जागा (फायर स्टेशनच्या मागील) | 5 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 37 | | | कोंढवा बु. स.नं. १८,१९ फायर स्टेशन समोर, तालाब कंपनी समोर | 20 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 38 | परिमंडळ कार्यालय क्र. 5 | कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय | कवठे अड्डा | 8 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 39 | | बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय | यशवंत राव चव्हाण माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी | 10 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 40 | | | लोवर इंदिरा नगर स.नं. ६७०, ६७१ बिबवेवाडी पोलीस स्टेशन मागील शाळा मैदान | 15 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| 41 | | | यशवंत राव चव्हाण शाळा, बिबवेवाडी | 15 | 10,000.00 | 900.00 | 1,000.00 |
| | | | एकूण | 591 | | | |